उमटले मनी.....
पाहिनि या लोचनी एकुनि नाना ध्वनी, तरंग
उठले अंगावरी त्या मुग्ध स्पर्शानी,
गंधित होते सारे फुलता ती रातराणी,
चांदण्या राती भेटता दो मधुर ध्वनी,
कधी ओठांवरी हास्य कधी नयनी पाणी,
स्मरता अताशा पूर्वजन्माच्या आठवणी,
कधी रेखाटल्या रेषा कधी शब्दरूपातुनी,
साकारले चित्र जे अनुभवले या कवीमनी,
जे न देखिले कधी स्वप्नी, ते भाव सारे
आज उमटले मनी....

'ओम नमोजी आद्या'। लय आणि ताल यांचा अप्रतिम मेळ होऊन स्वरबद्ध झालेला, कानी पडणारा सुमधुर सूर म्हणजे... 'गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर' लता ताई म्हणजे महाराष्ट्राचा अभिमान... त्यांना पाहून नेहमी खात्री व्हायची कि खऱ्या अर्थाने 'मराठी पाऊल पडते पुढे'... या स्वरामृतांनी भरलेल्या 'मधुघटानं' भारतातील प्रत्येक मनात गोडी कि त्यांनी दशकं 'वसंत फुलवून' अनेकांचे 'जीवन सुगंधित' केले आहे. 'निश्चयाचा महामेरू' असलेल्या 'प्रभू शिवाजीराजांच्या' या 'आनंदवन भुवनी' लताताईंनी माझे गाणं एकच माझे नित्याचे गाणे असे म्हणत आपल्या स्वरातील हजारो गाण्यांनी सुरांचा अनोखा 'खेळ मांडीयेला' आणि चहूकडे पसरला तो फक्त 'आनंदी आनंद'.

इतरांप्रमाणेच 'आले वयात मी' सुद्धा हाच आवाज ऐकता ऐकता. 'चाफा बोलेना चाफा चालेना'.... बालपणी रेडिओवर ऐकलेले पहिले वाहिले गाणे असेल... आणि बालगीतांसोबतच या बालमनात भावगीतांबद्दलही रूची निर्माण झाली. त्यांकाळी ऐकलेले 'तिन्हीसांजा सखे मिळाल्या' हे गाण्याचे कठीण वाटणारे पण माझे हे सर्वात आवडते गाणे. 'घनतमी शुक्र बघ राज्य करी,' 'भवान सदन तेजोमय,' 'सुन्या सुन्या' या गीतांचीही तीच कहाणी. शाळेत 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' ही कविता अभ्यासाला होती तेव्हा त्या आवाजातील आर्तपणाने मन भरून आले... तोच आवाज झेंडावंदनाच्या दिवशी 'जयोस्तुते जयोस्तुते' गाताना राष्ट्राभिमान जागृत करत असे. 'वेडात मराठे वीर' ऐकले कि कुठून तरी नवे बळ अंगात संचारले जाई... एक नवा आत्मविश्वास जागृत होई.

'घनश्याम सुंदरा श्रीधरा' हे बालपणी रोज सकाळी वाजणारे गीत... या गीतासोबत एक वेगळेच नाते होते. म्हणजे सकाळची सुरूवातच लताताईंच्या आवाजाने होई. 'गजानना श्री गणराया,' 'तुज मागतो मी आता' या गीतांशिवाय तर गणेशोत्सव कधी झालाच नाही. 'गणराज रंगी नाचतो' हे गाणे आजही कधीही ऐकले तरी गणपतीचे आत्ताच घरात आगमन झाले आहे, असा भास होतो. 'उठा उठा हो सकलीक' या गीतात फक्त वाचेतून खरच गजमुखाचे साक्षात दर्शन घडते. गणेशाप्रमाणेच विठ्ठल कळला तो याच आवाजातून. 'विठ्ठल तो आला आला' म्हणत 'आजि सोनियाच्या दिनु सुंदर ते ध्यान पंढरपुराचा निळा' साक्षात डोळ्यांसमोर उभा रहातो. संत ज्ञानेश्वरांच्या रचना आणि लताताईंचा आवाज.... म्हणजे दुधात साखर. 'अरे अरे ज्ञाना झालासी' 'रंगा येई वो येई' चा तो आलाप असो वा 'पैल तो गे काऊ' मधील ती अधीर आळवणी.... कधी 'घनु वाजे घुणघुणा' तर कधी वारा वाहे 'रुणझुण रुणझुणु'... या मधुर आवाजातील 'पसायदान' ऐकताना मनाला एक वेगळीच शांतता जाणवते. संत तुकाराम रचित 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' हे गाणे ऐकताना खरेच 'आनंदाचे डोही आनंद तरंग' निर्माण होतात.... इतकी या सुरांत जादू. 'लाजली सीता स्वयंवराला' गाणे ऐकताना साक्षात ते स्वयंवर डोळ्यांसमोर उभे राहते जसे 'इंद्र जिमी जंभ पर' ऐकताना शिवराज्याभिषेक पाहिला.... 'आज गोकुळात रंग खेळतो हरी' ऐकले की आपोआपच पाय जागेवरच थिरकू लागतात आणि 'मनमोराचा पिसारा' फुलू लागला. 'विसरू नको श्रीरामा मला' ऐकले कि अंतरीची हाक खरेच देवापर्यंत पोहोचते आहे असा विश्वास निर्माण होतो. असा हा अमृततुल्य आवाज म्हणजे 'भावभोळ्या भक्तीची' मधुर मुरली.

भक्तिगीतांप्रमाणेच चित्रपट गीतांतही या आवाजाची मोहिनी काही औरच. कधी 'श्रावणात घन निळा बरसला' 'निळ्या आभाळी कातरवेळी' 'असा बेभान हा वारा' वाहू लागतो, 'घन ओथंबून येती' या बरसू लागतो आणि 'चिंब पावसानं रान' जागं होतं तेव्हा मंत्रमुग्ध स्वररेषांत नख गाण्यातील तो अवखळ आवाज रसिकाला खरोखरच्या ऐकताना सारे सारे थेंब शिरक्यांत चिंब चिंब भिजवतो. 'वारा गाई गाणे' 'प्रीतीचे तराणे' ऐकताना... 'बदलती झाल्यासारखे वाटते. 'आज उदास उदास दूर' असलेल्यांनी प्रश्न पडावा... 'धरतीला नभाचे हे रंग कसे?' आणि वाटू लागते 'चित्र तुझे हे सजीव होऊन येईल'... 'प्रेमा स्वरूप आई' हे गाणे गायचे 'लागले पंख प्रीतीला' शाळेत एकदा स्पर्धेत मी. पण त्या गीतातून खूप दरवळ... वर वर सोपे वाटणारे हे गीत फारच कठीण... प्रत्येक प्रसंगावर ताईंनी गाणी काही शिकले. एखाद्या मुलीच्या जीवनातील तर प्रत्येक प्रसंगावर गाणी गायली आहेत. 'मेंदीच्या पानावर' हे आणखी एक माझे प्रिय गीत. हे गाणे, हा आवाज कितीदाही ऐकलं तरी पुन्हा प्ले चे बटण दाबलेच जाते. 'जन पळभर म्हणतील हाय हाय' पण तरी 'नाही कशी म्हणू तुला' म्हणत एखाद्या प्रेयसीची प्रेमाची व्यथा अचूक मांडली आहे. 'हसले गं बाई हसले' या गाण्यातील नवतरुणीची प्रेमाची सुरुवात.... 'एक लाडकी या घरची', 'नववधू प्रिया मी बावरते' 'घेऊ कसा उखाणा' मधली नववधूची उत्सुकता... 'गंगा जमुना' मधील पाठवणीची वेळ... ज्या 'जय देवी मंगळागौरी' म्हणत फेर धरणारी, 'सप्तपदी मी रोज चालते' म्हणत संसार चालवताना 'जीवनात ही घडी अशीच राहू दे' अशी इच्छा सदैव जोपासणारी ती आणि तिची कहाणी. 'लटपट लटपट' या गाण्यातील ठेका असो वा 'वादळवारं सुटलं गं' 'माझ्या सारंगा' 'माळ्याच्या मळ्यामंदी' या गाण्यातील तिची लगबग... अशी साऱ्याच नाती, भावना या आवाजाने खूप छान सांभाळून घेतल्या. लतादीदींनी गायलेली अंगाईगीते सुद्धा किती गोड. 'नीज माझ्या नंदलाला', 'निजल्या तान्ह्यावरी माऊली', 'बाळा होऊ कशी उतराई' 'झुलतो बाई रास झुला'... 'घरात हसरे तारे असता' 'मी पाहू कशाला नभाकडे' असे या प्रसंग, भावना, वय जरी वेगळे तरी आवाज एकच... तो म्हणजे लता ताईंचाच.

'चांद केवड्याची रात' खूप वर्षांपूर्वी ऐकले होते आणि तेव्हापासून ते ओठांवर अगदी सहज विराजमान झाले. 'चांद मातला मातला' हे अशाच अजरामर गीतांपैकी एक. 'माज खुणी माजं माया', 'तो एक राजपुत्र', 'धुंद मधुमती रात रे', 'बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भीती गं', 'शोधू मी कुठे कशी', 'या चिमण्यांनो परत फिरा रे', 'मी रात टाकली', 'सुधा काली या अशा', 'मी डोलकर', 'मजा लावताय डोळा', 'भेटीलागी जीवा', 'अवचित परिमळ', 'ऐरणीच्या देवा', 'मावळत्या दिनकरा', 'भय इथले संपत नाही' अशी एक ना हजार गीते... 'लता' या दोन अक्षरांच्या नाजूक वेलीवर बहरलेली अजरामर अशी स्वरसुमनें. 'देवाची इच्छा... आता विसाव्याचे क्षण आले...' आणि डोळे पाण्याने भरले पण ही 'कोकीळ कुहूकुहू' अनंतकाळ गात राहील आणि आपणा सर्वांच्या आयुष्यात 'मोगरा' असाच फुलत राहील. तरी पुन्हा एकदा विचारावेसे वाटते "हे स्वरलता.... 'येशील कधी परतून?'" पण शेवटी 'जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला' हे सत्य आपणही समजून घ्यायला हवे. आणि म्हणूनच, 'अखेरचा हा तुला दंडवत'!!!

शब्द लेखन - रूपाली गोंबरे
अक्षर लेखन - प्रकाश देशपांडे

